## निशाणी क्रमांक २४ वरील आदेश

(दि. २३/१२/२०२४ रोजी पारीत)

**०१.** प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादीचे विरूध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९, नियम १ व २ अन्वये सादर केलेला आहे. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून अर्ज नाकारला.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. वादीतर्फे विधीज्ञ पी.पी.बनसोड व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ व्हि.ए.बेलोकार यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रीया संहिता अन्वये असलेल्या संबंधीत तरतुदींचा संदर्भ घेतला.

**०३.** प्रस्तुत प्रकरणांत खालील वादप्रश्न निर्माण होत असून त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे त्याने शाबित केले आहे काय? | ..... नाही |
| २) | न्यायाचा समतोल वादीचे लाभात असल्याचे त्याने शाबित केले आहे काय ? | ..... नाही |
| ३) | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे त्याने शाबित केले आहे काय ? | ..... नाही. |
| ४) | आदेश ? | ... अंतीम आदेशान्वये |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ४ करिता :–**

**०४.** वादीने प्रतिवादीच्या विरूध्द दावा मिळकतीची मालकी घोषित व वादी व प्रतिवादीमध्ये झालेले खरेदी खत वादीवर बंधनकारक नाही ही मागणी मिळण्याकरीता दावा

दाखल केलेला असून वादीने प्रतिवादीस दावा मिळकत ही सावकारी व्यवहारातून दिनांक ०९/०६/२०११ खरेदी दिलेली आहे त्यामुळे प्रतिवादीने दावा मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणाला विक्री करू नये असे वादीचे कथन आहे. मात्र वादीने दिनांक ०९/०६/२०११ रोजीचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या दावा मिळकतीचे खरेदी खत दाखल केलेले नाही, त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेले व्यवहार हा सावकारीतून झालेला आहे हे म्हणणे उचित होणार नाही. वादी याने निशाणी क्र. ४ सोबत दावा मिळकत मौजे येडशी ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथील गट क्र. २७/१/अ क्षेत्र ० हे. ४६ आर. चा सातबारा चा उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता—यामध्ये प्रतिवादीच्या नावाची नोंद असून सदर नोंद ही फेरफार क्र. ४५१ नुसार झाल्याचे आहे, सदर फेरफारचे अवलोकन केले असता सदर फेरफार हा खरेदी खत क्र. १६५०/२०११ अन्वये झाल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येते. गाव नमुना क्रमांक ७/१२ उता—यावरील नोंदी महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ चे नियम ३, ५, ६, ७ व २९ अन्वयेच्या तरतुदीनुसार केल्या जातात. दावा मिळकतीच्या गाव नमुना क्रमांक १२ च्या उता—यावर प्रतिवादीच्या नावाची नोंद असल्याने सदर मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होते, त्यामुळे दावा मिळकतीत वादीचा कोणताही हक्क नसल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. सबब सर्व विवचनाअंती असा निष्कर्ष निघतो की, वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करण्यास त्यास अपयश आलेले आहे.

**०५.** न्यायाचा समतोल म्हणजे तुलनात्मक अपाय अथवा पक्षकारांची होणारी गैरसोय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीस किती अपाय होईल या बाबीसह सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांना किती अपाय होईल या बाबीचा देखील विचार करणे आवश्यक असते.

**०६.** प्रस्तुतचा मनाई अर्ज नामंजुर केल्यास वादीस जो काही अपाय होईल.त्यापेक्षा निश्चितच जास्त अपाय सदर मनाई अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांना होईल. त्यायोगे न्यायाचा समतोल वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यास अपयश आलेले आहे.

**०७.** प्रस्तुत मनाई अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे जास्त प्रमाणात अपरिमित हानी होईल. त्यायोगे प्रस्तुत मनाई अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे शाबीत करण्यास त्यास अपयश आलेले आहे.

**०८.** सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तिन्ही संज्ञा केवळ अंलकारिक भाषेचा नमुना नसुन सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यास अपयश आल्यामुळे प्रस्तुत मनाई अर्ज नामंजुर करण्याच्या योग्यतेचा आहे. त्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहेत.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

**स्वा/—**

दिनांक २३/१२/२०२४

**( ख्वाजा चॉ. कलाल )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर मंगरूळपीर
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

**CERTIFICATE**

" I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shri. Gadge C.R. (Grade – III) |
| Court Name | : | Shri. Khwaja C. Kalal,<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Mangrulpir |
| Date of Order | : | 23/12/2024 |
| Order signed by presiding officer on | : | 23/12/2024 |
| Order uploaded on | : | 23/12/2024 |